| MHPU200039222023 | | | | |
|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | ०९/११/२०२३ | | |
| | नोंदणी तारीख | ०९/११/२०२३ | | |
| | निकाल तारीख | १४/०७/२०२६ | | |
| | कालावधी | वर्ष | महिने | दिवस |
| | | ०२ | ०८ | ०५ |

<u>**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. १ घोडनदी, शिरुर, जि.पुणे यांचे न्यायालयात**</u>
(**पिठासीन अधिकारी संजय दि.वानखेडे**)

**नियमीत फौजदारी खटला क्रं. ८९९/२०२३** **निशाणी क्र. ३२.**

| गुन्हा नोंद क्रं. २५२/२०२२ | शिरुर पोलीस स्टेशन |
|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>शिरुर पोलीस स्टेशन, पुणे. |
| अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ | श्री. एस. व्ही. कदम, सहा. सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | १. **अमोल बाबजी निचित**<br>वय– २७ वर्षे, व्यवसायः शेती,<br>२. **अक्षय बाळु पानमंद**<br>वय– २३ वर्षे, व्यवसायः शेती,<br>३. **सुभाष दिलीप बाबर**<br>वय– २३ वर्षे, व्यवसायः शेती,<br>सर्व रा. वडनेर, ता.शिरुर. जि. पुणे. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | विधिज्ञ श्री. एस. बी. जाधव |

<u>**भाग–ब**</u>
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०९/०४/२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | १०/०४/२०२३ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | ०९/११/२०२३ |

| | |
|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | १४/०७/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १४/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | १४/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | -- |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अमोल बाबजी निचित | १५/०७/२०२२ | १५/०७/२०२२ | भा.दं.वि.स. कलम ३२४, ५०४, ५०६ व ४२७ प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | -#- | -#- |
| २. | अक्षय बाळु पानमंद | १५/०७/२०२२ | १५/०७/२०२२ | भा.दं.वि.स. कलम ३२४, ५०४, ५०६ व ४२७ प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | -#- | -#- |
| ३. | सुभाष दिलीप बाबर | १५/०७/२०२२ | १५/०७/२०२२ | भा.दं.वि.स. कलम ३२४, ५०४, ५०६ व ४२७ प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | -#- | -#- |

**भाग-क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | प्रतिक सुरेश निचीत | फिर्यादी साक्षीदार | २९ |
| २. | मंगल सुरेश निचीत | साक्षीदार | ३१ |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| निरंक | ३० | फिर्याद |

**क. बचावपक्षाने मान्य केलेले कागदपत्राचे**

| अ. क्र. | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. बचावपक्षातर्फे शाबीत केलेली कागदपत्रे**

| अ. क्र. | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**इ. न्यायालयामार्फत शाबीत केलेले कागदपत्रे**

| अ. क्र. | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ई. मुद्देमालाचे विवरण**

| अ. क्र. | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | मु.र.नं.३१० | एक लाकडी बांबुची काठी |

## न्या य नि र्ण य

## (दिनांक १४/०७/२०२६ रोजी घोषित केले)

आरोपीचे विरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम (संक्षिप्त 'भा.द.वि.स') ३२४, ५०४, ५०६ आणि ४५२ प्रमाणे शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासाठीचा खटला चालविणेत आला.

**अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात पुढीलप्रमाणे** –

२. दिनांक ०९/०४/२०२३ रोजी रात्री ०८.३० वाजताच्या सुमारास मौजे वडनेर, ता. शिरुर, जि. पुणे गावचे हद्दीत टैकेवाडी येथे फिर्यादीने आरोपींना त्यांच्या गोठयाची भींत पडल्याचा जाब विचारलेचा राग मनात धरुन आरोपींनी फिर्यादीचे घरात घुसून फिर्यादी व त्यांची आई मंगल यांना लाथाबुक्क्यांनी व बांबुचे काठीने मारहाण करुन फिर्यादी यांना मुक्का मार व फिर्यादीचे डाव्या हाताला आपखुशीने दुखापत केली. त्यामुळे फिर्यादीने पोलीस ठाणे शिरुर येथे आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली.

३. आरोपीच्या विरोधात दिनांक १४/०७/२०२६ रोजी दोषारोप निश्चित केला. त्यांनतर प्रकरणात अभियोगपक्षातर्फे एक साक्षीदार तपासण्यात आले. नि.क्र.१ वरील आदेशानुसार अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेल्या पुराव्यावरुन आरोपी विरुध्द गुन्हादर्शक पुरावा आढळुन न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) नुसारचे निवेदन नोंदवण्यात आले नाही. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. संपूर्ण पुरावा व दोन्ही बाजुचा युक्तीवाद पाहता खटल्याच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले. त्या प्रत्येक मुद्यावर कारणांसहीत उत्तरे खालीलप्रमाणेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०९/०४/२०२३ रोजी रात्री ०८.३० वाजताच्या सुमारास मौजे वडनेर, ता. शिरुर, जि. पुणे गावचे हद्दीत टैकेवाडी येथे फिर्यादीने आरोपींना त्यांच्या गोठयाची भींत पडल्याचा जाब विचारलेचा राग मनात धरुन आरोपींनी फिर्यादी व त्यांची आई मंगल यांना बांबुचे काठीने मारहाण करुन आपखुशीने गंभीर दुखापत केली आणि त्याद्वारे तुम्ही **भा.दं.वि.का. कलम ३२४ सह ३४** प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **..नाही** |
| २. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने प्रक्षोभित करून उद्देशपुर्वक शिवीगाळ केली. म्हणून तुम्ही **भा.दं.वि.का. कलम ५०४** प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **..नाही** |

| | | |
|---|---|---|
| ३. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीला फौजदारीपात्र दमदाटी करुन धाकपटशा करुन धमकी दिली. म्हणून तुम्ही **भा.दं.वि.का. कलम ५०६ सह ३४** प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **..नाही** |
| ४. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीच्या राहत्या घरात गुन्हया करण्याच्या हेतूने अनाधिकाराने गृह अतिक्रमण केले. म्हणून तुम्ही **भा.दं.वि.का. कलम ४५२ सह ३४** प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **.. नाही** |
| ५. | अंतिम आदेश ? | **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

:– **<u>कारणमिमांसा</u>** –:–

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ बाबतः</u>–**

**५.** भारतीय दंड विधान संहिता कलम ३२४, ५०४, ५०६ व ४५२ सह ३४ नुसार आरोपी वरील गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने प्रथम आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी व त्यांची आई मंगल यांना बांबुचे काठीने मारहाण करुन आपखुशीने गंभीर दुखापत करुन शिवीगाळ व दमदाटी केल्याच्या बाबी सिध्द करणे गरजेचे आहे.

**६.** अभियोगपक्षाने प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये फिर्यादी साक्षीदार क्र.१ प्रतिक सुरेश निचीत व साक्षीदार क्र. २ मंगल सुरेश निचीत यांना तपासले आहे. साक्षीदार क्र.१ व २ यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक ०९/०४/२०२२ रोजी काय घटना

घडली याबाबत त्यांना काहीही माहित नाही. तसेच, सदरी दिवशी आरोपींनी संगणमत करुन त्यांना बांबुचे काठीने मारहाण करुन आपखुशीने गंभीर दुखापत करुन शिवीगाळ व दमदाटी केली होती अशी कोणतीही घटना घडली नाही. त्याचप्रमाणे साक्षीदाराचा सरकारी वकील यांनी घेतलेल्या उलटतपासादरम्यान फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये तडजोड झालेबाबत मान्य केलेले आहे. तसेच, त्यांच्यामध्ये आता कोणताही वाद राहीलेला नाही ही बाब देखील मान्य केलेली आहे. त्यामुळे आरोपींनी संगणमत करुन दिनांक ०९/०४/२०२३ रोजी रात्री ०८.३० वाजताच्या सुमारास मौजे वडनेर, ता. शिरुर, जि. पुणे गावचे हद्दीत टैकेवाडी येथे फिर्यादीने आरोपींना त्यांच्या गोठयाची भींत पडल्याचा जाब विचारलेचा राग मनात धरुन आरोपींनी फिर्यादी व त्यांची आई मंगल यांना बांबुचे काठीने मारहाण करुन दुखापत केल्याचे व शिवीगाळ, दमदाटी केल्याच्या बाबी सिध्द होत नाही.

**७.** प्रस्तुत कामातील सर्व पुराव्यांचे व कागदपत्राचे अवलोकन केले असता आरोपींच्या विरोधात कोणताही सबळ पुरावा पटलावर आलेला नाही. फौजदारी खटल्यांमध्ये आरोपीविरुध्दचा गुन्हा विनाशंका शाबीत होणे गरजेचे आहे. परंतु सदरकामी आरोपीस प्रस्तुत गुन्हयात गोवणारा कोणताही पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे. आरोपीने भा.दं.सं.कलम ३२४, ५०४, ५०६ आणि ४५२ सह ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे शाबीत न झाल्यामुळे सर्व आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते. सबब मुद्दा क्र.५ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. आरोपी **अमोल बाबजी निचित, अक्षय बाळु पानमंद व सुभाष दिलीप बाबर** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भा.दं.सं.कलम ३२४, ५०४, ५०६ आणि ४५२ सह ३४ मधील आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

**२.** आरोपीने दिलेले वैयक्तिक जातमुचलके व जामीन कतबे रद्द करण्यात येत आहेत.

**३.** जप्त मुद्देमाल एक लाकडी बांबु हा मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ)चे तरतुदीची पुर्तता करणेसाठी आरोपीने रक्कम रु.५,०००/– चा जातमुचलका पुढील सहा महिन्याचे कालावधीकरिता द्यावा.

(येणेप्रमाणे खुल्या न्यायालयात उद्घोषित)

SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE

Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2026.07.14 18:45:02 +0530

**दिनांक –१४/०७/२०२६**
**शिरुर, पुणे.**

**(संजय दि. वानखेडे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. १**
**घोडनदी, ता. शिरुर, जि.पुणे.**